गावो रक्षति रक्षितः
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
महाराष्ट्र गोसेवा आयोग
Maharashtra Goseva Ayog

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन आयुक्तालय Animal Husbandry Commissionerate
१ ला मजला, स्पायसर कॉलेजच्या समोर, औंध-खडकी रोड, औंध, पुणे - ४११०६७ 1st Floor, Opposite Spicer College, Aundh-Khadki Road, Aundh, Pune - 411067,

ई-मेल- mhgosevaayog@gmail.comकार्यालय फोन नं.- ०२० २९९५२६६५/२९९५०९०९

---

जा. क्र. मगोसेआ / सूगोगोसेकेयो मा.सू./प्र.क्र.०९/४४०/२०२४ / पुणे-६७ दि. ०१.०७.२०२६

**मार्गदर्शक सुचना**

प्रति,

**१. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)**

**२. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (सर्व)**

**विषय :- " गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" ह्या नविन सुधारित योजने अंतर्गत एकूण ३२४ तालुक्यांपैकी उर्वरित पात्र तालुक्यातील ( एकूण -१४४) गोशाळांचे प्रस्ताव सादर करणेबाबत....**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक पविआ-२०२१/प्र.क्र.३५६/पदुम-३, दिनांक १७/०५/२०२३.
२. महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम २०२३ दि. २८.०४.२०२३ रोजी राजपत्राधील प्रसिद्ध अधिसूचना
३. महाराष्ट्र गोसेवा आयोग प्रारंभ दिनांक - १०.०५.२०२३ अधिसूचना
४. शासन आदेश क्र. पविआ-१०२४/प्र. क्र. १९१/पदू-३ दिनांक ११/०७/२०२४
५. जा. क्र. एसएलटी/गो.से./१७८(भाग-२)/६८६२/२०२३-२४ पस-१२ ,औंध, पुणे-६७ दि. १८/०७/२०२४
६. जा.क्र. मा.गो.आ/प्र.क्र.-०९/सु.गो.गो.यो/४३५/२०२३,औंध,पंस-१२,पुणे-६७,दि. ३०/०६/२०२६ (जाहिरात सूचना)

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयाद्वारे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन "सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. दिनांक २८/०४/२०२३ शासन राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र गोसेवा आयोग नियम २३ अन्वये राज्यात गोवंशाचे संवर्धन संरक्षण व कल्याण करण्यासाठी तसेच यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थाचे पर्यवेक्षण करण्यासाठी राज्यात गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असून दिनांक १०/०५/२०२३ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध अधिसूचनेनुसार राज्यात गोसेवा आयोग लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संदर्भ १ शासन निर्णयातील मुद्दा क्र. १७ नुसार गोसेवा आयोग पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर सदर योजनेची पुढील कार्यवाही महाराष्ट्र गोसेवा आयोग यांचे मार्फत करण्यात यावी असे नमूद केले असल्याने शासन पत्र क्र. ४ व खात्याचे पत्र क्र. ५ अन्वये सदर योजना या कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

सदर योजनेच्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण ३२४ तालुक्यातील प्रत्येकी एका गोशाळेस योजनेचा लाभ द्यावयाचा आहे. सन २०२३-२४ व २०२५- २६ मध्ये सदर योजने अंतर्गत शासन पात्र एकूण १८० गोशाळांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२६-२७ मध्ये उर्वरित १४४ तालुक्यांतील गोशाळांना लाभ देण्यासाठी online अर्ज मागविण्यात येत आहेत.

**ऑनलाइन अर्ज करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ :-**

https://schemes.mahagosevaayog.org/revised/govardhan-govansh-application

या अनुषंगाने योजनेचे उद्देश, देय अनुदान, अर्जाचा विहित नमुना, अर्ज करण्याची पध्दत इ.बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**सोबत जोडलेल्या १४४ तालुक्यातील गोशाळांचे online अर्जच योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी विचारात घेतले जातील** (सोबत तालुक्यांची यादी जोडण्यात आलेली आहे.)

**१. योजनेचे उद्देश :**

**(अ) मुलभूत उद्देश :-**

(१) दुग्धोत्पादनास, शेती कामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या / असलेल्या गाय, वळू, बैल व वय झालेले गोवंश यांचा सांभाळ करणे.

(२) अशा पशुधनासाठी चारा, पाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन देणे.

(३) गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे.

(४) गोमूत्र, शेण इ. पासून विविध उत्पादने, खत, गोबरगॅस व इतर उप-पदार्थांच्या निर्मीतीस प्रोत्साहन / चालना देणे.

**(ब) या योजनेअंतर्गत गोशाळा अनुदान पात्र ठरल्यास गोशाळांना विविध विभागाच्या/संस्थांच्या सहकार्याने पशुसंवर्धन विषयक उपक्रम राबविणे गरजेचे असल्याने पुढील बाबीचे पालन करावे लागेल:-**

(१) राज्याच्या पशुपैदाशीच्या प्रचलीत धोरणानुसार देशी गायीच्या जातीचे संवर्धन व त्यांच्या संख्येत वाढ होण्याकरीता संस्थेकडील देशी तसेच गावठी गायींमध्ये शुध्द देशी गायीच्या जातीच्या वळूचे वीर्य वापरुन कृत्रिम रेतन करुन घेणे.

(२) वरील प्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली नर वासरे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मागणीनुसार गोठीत रेतन प्रयोगशाळेसाठी नाममात्र दराने उपलब्ध करुन घेणे

(३) वरील प्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली उर्वरीत नर वासरे व कालवडी यांची मागणीप्रमाणे शेतक-यांना विक्री करणे.

(४) संस्थेमधील पशुधनामध्ये आंतरपैदास झाल्यास निर्माण होणाऱ्या नर वासरे / कालवडी यांची वाढ खुंटणे, कालवडी उशिरा माजावर येणे, वेळीच गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे इत्यादी विपरीत परीणाम होऊ शकतात. हे टाळण्यासाठी संस्थेमधील वळूचे खच्चीकरण करणे गरजेचे असेल.

(५) संस्थेने प्राप्त अनुदानाच्या खर्चाचे स्वतंत्र हिशोब ठेवणे व सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्रासह आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे.

(६) महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाद्वारे दुग्धव्यवसाय विभाग, स्वयंसेवी संस्था, सहकारी दूध संघ, पशुपैदासकाराच्या संघटना आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेशी समन्वय ठेवून त्यांचा सक्रिय सहभाग मिळविणे गरजेचे असेल.

(७) महाराष्ट्र गोसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकरण विहित करेल अश्या सर्व अटी शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

**२. लाभार्थी निवडीचे निकष / अटी व शर्ती :**

(१) सदरची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असावी.

(२) भारत पशुधन प्रणालीवर (NDLM) गोशाळा मालकाची व गोशाळेत असलेल्या पशुधनाची नोंद असणे बंधनकारक आहे. सदर बाबतीत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे द्वारा गोशाळा तपासणी अंतर्गत सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मधील अहवालात नमूद पशुधनाच्या नोंदी नुसारच अनुदान अनूज्ञेय राहील.

(३) सदर संस्थेचे नजीकच्या मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असणे आवश्यक आहे.

(४) संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा.

(५) केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण / चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वतःच्या मालकीची अथवा ३० वर्षाच्या नोंदणीकृत भाडेपट्टयावरची किमान ०५ एकर जमीन असावी.

(६) संस्थेने या योजनेंतर्गत मागणी केलेल्या एकूण अनुदानाच्या कमीत कमी १० टक्के एवढे खेळते भाग-भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे.

(७) संस्थेस गोसेवा / गो-पालनाचे कार्य करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्यासोबत करारनामा करण्याचे बंधनकारक राहील.

(८) संबंधीत संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

(९) संस्थेवर कार्यरत कर्मचारी / मजूर यांचे वेतन इ. चा खर्च संस्थेकडून अदा करण्यासाठी /संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी.

(१०) या योजनेंतर्गत ज्या बाबीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल, त्याच बाबीसाठी भविष्यात नव्याने कोणतेही अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

(११) ज्या संस्थांकडे पशुधनाच्या देखभालीसाठी व चाऱ्यासाठी स्वतःच्या उत्पनाचे साधन आहे, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

(१२) प्रशासकीय विभागाची पुर्वपरवानगी घेऊन, केवळ मूलभूत सुविधा निर्माण करण्याकरीताच, अनुदान देय राहिल.

(१३) प्रशासकीय विभागाची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय मूलभूत सुविधा निर्माण केल्यास, अशा बाबींसाठी सदर योजनेत अनुदान मंजूर करण्यात येणार नाही.

३. <u>या योजनेमध्ये प्रामुख्याने खालील मुलभुत सुविधाकरिता अनुदान देय ठरेल :-</u>

(१) पशुधनासाठी नविन शेडचे बांधकाम, चा-याची, पिण्याची व्यवस्था व वैरण उत्पादनासाठी पाण्याच्या उपलब्धतेकरिता विहिर/बोरअरवेल, चारा कटाई करण्यासाठी विद्युत चलित कडबाकुट्टी यंत्र, मुरघास प्रकल्प, गांडुळखत निर्मिती प्रकल्प, गोमूत्र, शेण यापासून उत्पादन निर्मिती प्रकल्प व विक्री केंद्र इत्यादी अशा प्रकारच्या मुलभूत सुविधांकरिता अनुदान देय असेल. जुन्या शेडच्या दुरूस्तीकरिता या योजनेमधुन अनुदान मिळणार नाही. तसेच संस्थेकडे असलेल्या बाबींसाठी अनुदान देय होणार नाही.

(२) गोशाळेकडील पशुधनास निवारा तसेच पाण्याची व्यवस्था या प्राथमिक गरजा असल्याने ज्या गोशाळांकडे पशुधनाच्या निवा-यासाठी शेडची व्यवस्था नाही तसेच पाण्याची व्यवस्था नाही अशा संस्थांना प्राधान्याने या बांबीसाठीच मुलभुत सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान अनुज्ञेय राहिल. ज्या संस्थांकडे उपरोक्त नमुद निवारा व पाण्याची व्यवस्था यापैकी एखादी बाब उलब्ध असेल त्यांना उर्वरित बाबीसाठी मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान देय असेल.

(३) कृषि/पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणा-या केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हास्तरीय विविध योजनांमधुन, चारा उत्पादनांच्या योजनांमधुन या गोशाळांना वैरण लागवडीसाठी बियाणे, खते, ठोंबे, हायड्रोपोनिक, वाळलेला चारा उत्पादन/ओला चारा उत्पादन करण्यासाठी लाभ अनुज्ञेय राहतील.

(४) ज्या संस्थाकडे उपरोक्त नमुद दोन्हीबाबी उपलब्ध असेल त्यांना वैरण उत्पादन मुरघास प्रकल्प गाडुळखत निर्मिती प्रकल्प गोमुत्र, शेण यापासून उत्पादन निर्मिती प्रकल्पासाठी प्राधान्याने अनुदान देय राहिल.

**इतर आवश्यक बाबी:-**

(१) याशिवाय या गोशाळांना रूग्ण पशुधनास आवश्यक असलेल्या पशूवैदयकीय सेवा जवळच्या पशूवैदयकीय दवाखान्यामार्फत उपलब्ध करुन घ्याव्यात.

(२) विदयुत जोडणी आवश्यक असल्यास कृषि/कृषिपंप या बाबी अंतर्ग प्रचलित योजनेमधुन या गोशाळांनी विदयुत जोडणी प्राप्त करून घ्यावी. या लाभासाठी प्रस्तुत योजनेमधुन अनुदान देय होणार नाही.

(३) या योजनेंतर्गत अनुदानासाठी निवड करण्यात आलेल्या गोशाळेच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार **आयुक्त पशुसंवर्धन** यांना राहतील.

(४) उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यानतर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून मंजुर अनुदानातील पुढे नमुद केल्याप्रमाणे ६० टक्के हिस्सा संबधित गोशाळेस प्रथम टप्प्यात वितरित करण्यात येईल. वितरित अनुदानाचा विनियोग अनुज्ञेय बाबीवरच ३ महिन्याच्या कालावधीत करणे बंधनकारक असेल. प्रथम टप्प्यातील अनुदानाचा विनियोग झाल्यानंतरच दुस-या टप्प्यातील उर्वरित देय अनुदान संस्थेस वितरित करण्यात येईल. उर्वरित अनुदानाचा विनियोग अनुज्ञेय बाबीवरच ३ महिन्यात करणे संस्थेस बंधनकाराक राहिल.

४. देय अनुदान :-

(अ) **सदर योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या गोशाळेस त्यांच्याकडे असलेल्या पशुधन संख्या विचारात घेऊन दोन टप्प्यात पुढे नमुद केल्याप्रमाणे अनुदान देय राहील.**

| अ. क्र | गोशाळेकडे असलेले पशुधन संख्या | एकुण देय अनुदान | अनुदान | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रथम टप्पा ६० टक्के | दुसरा टप्पा ४० टक्के |
| १. | ५० ते १०० | १५ लक्ष | ९ लक्ष | ६ लक्ष |
| २. | १०१ ते २०० | २० लक्ष | १२ लक्ष | ८ लक्ष |
| ३. | २०० पेक्षा जास्त | २५ लक्ष | १५ लक्ष | १० लक्ष |

५. **" सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" या योजनेतंर्गत लाभार्थी गोशाळांची निवड :-**

**(अ) सदर योजना राबविण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी आपल्या जिल्हयामध्ये व्यापक प्रसिध्दी प्रचार करून खालील नमुद वेळापत्रकाप्रमाणे अर्ज online प्राप्त करून घ्यावेत व प्राप्त झालेले परिपुर्ण प्रस्ताव प्रादेशिक स्तरावरील समितीस online पुढील कार्यवाहीसाठी सादर करावेत.**

| | | |
|---|---|---|
| १. | स्थानिक स्तरावर प्रसिध्दी देणे | दि. ०१.०७.२०२६ |
| २. | पात्र सस्थांकडुन अर्ज स्वीकारणे | दि. ०१.०७.०२६ ते दि. ३१.०७.२०२६ |
| ३. | जिल्हा स्तरावर छाननी करणे | दि. ०१.०८.२०२६ |
| ४. | जिल्हा स्तरावरुन प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे प्रस्ताव सादर करणे. | दि. ११.०८.२०२६ |
| ५. | प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांच्या स्तरावर छाननी करणे | दि. १२.०८.२०२६ ते ३१.०८.२०२६ |
| ६. | प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे कडुन महाराष्ट्र गोसेवा आयोग कार्यालयास सादर करणे | दि. ०१.०९.२०२६ |
| ७. | महाराष्ट्र गोसेवा आयोग कार्यालय स्तरावर छाननी करणे | दि. ०२.०९.२०२६ ते ३० .०९.२०२६ |
| ८. | प्रस्ताव शासनास सादर करणे | दि. ०१.१०.२०२६ |

**(ब) प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी करण्यासाठी प्रादेशिक स्तरावर खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे :-**

| | | |
|---|---|---|
| १. | संबधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन | अध्यक्ष |
| २. | संबधित सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | सदस्य |
| ३. | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचे कार्यालय | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने शासन निर्णयातील अटी शर्तीनुसार प्रस्तावांची छाननी करून शासन निर्णयात नमुद ज्या पात्र तालूक्यामध्ये गोशाळा निवड प्रस्तावित आहे **अशाच तालुक्यातील परिपूर्ण प्रस्ताव महाराष्ट्र गोसेवा आयोग कार्यालयास सादर करावे.**

**(क) या योजनेंतर्गत अनुदानासाठी गोशाळेची निवड करण्याचे अधिकार पुढे नमुद राज्यस्तरीय निवड समितीस राहतील :-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री ( पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास) | अध्यक्ष |
| २. | मा. राज्यमंत्री ( पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास) | उपाध्यक्ष |
| ३. | प्रधान सचिव / सचिव (पदुम) | सदस्य |
| ४. | आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी नामनिर्देशीत केलेला उपसचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (नियोजन) यांनी नामनिर्देशीत केलेला उपसचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ७. | तीन अशासकीय सदस्य | सदस्य |
| ८. | उपसचिव / सहसचिव (पशुसंवर्धन) | सदस्य सचिव |

**सोबत :- सदर अर्ज online पद्धतीने आयोगाच्या संकेतस्थळावर गोशाळांनी भरावयाचे असल्याने सर्व नमुने संकेत स्थळावर अपलोड केले आहेत. सोबत तालुक्यांची यादी**

https://schemes.mahagosevaayog.org/revised/govardhan-govansh-application

१. गोशाळेच्या अनुदान मिळणेबाबतचा अर्ज.

२. परिशिष्ट “अ”- शपथपत्र.

३. प्रपत्र १ व विवरण पत्र

01/07/2026.

(डॉ. शामकांत प्रभाकर पाटील)
सदस्य सचिव,
महाराष्ट्र गोसेवा आयोग

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-

१. मा.अपर मुख्य सचिव, (पदूम), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मरस्त्यव्यवसाय विभाग मंत्रालय, मुबई ३२.

२. मा. आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे

| नवीन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेअंतर्गत निवड करावयाच्या उर्वरित तालुक्यांचा जिल्हानिहाय तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभाग | अ. क्र. | जिल्हा | अ. क्र. | तालुका |
| १ | कोकण | १ | ठाणे | १ | उल्हासनगर |
| | | | | २ | अंबरनाथ |
| | | २ | पालघर | १ | डहाणू |
| | | | | २ | जव्हार |
| | | | | ३ | मोखाडा |
| | | | | ४ | विक्रमगड |
| | | ३ | रायगड | १ | पेण |
| | | | | २ | अलिबाग |
| | | | | ३ | मुरुड |
| | | | | ४ | उरण |
| | | | | ५ | माणगाव |
| | | | | ६ | तळा |
| | | | | ७ | सुधागड |
| | | | | ८ | महाड |
| | | | | ९ | पोलादपूर |
| | | | | १० | श्रीवर्धन |
| | | | | ११ | म्हसळा |
| | | ४ | रत्नागिरी | १ | रत्नागिरी |
| | | | | २ | संगमेश्वर |
| | | | | ३ | लांजा |
| | | | | ४ | गुहागर |
| | | | | ५ | मंडणगड |
| | | | | ६ | खेड |
| | | ५ | सिंधुदुर्ग | १ | वैभववाडी |
| | | | | २ | देवगाव |
| | | | | ३ | मालगाव |
| | | | | ४ | सावंतवाडी |
| | | | | ५ | कुडाळ |
| | | | | ६ | वेंगुर्ला |
| | | | | ७ | डोडामार्ग (कासल) |
| २ | पुणे | १ | पुणे | १ | पुणे शहर |
| | | | | २ | पिंपरी चिंचवड |
| | | | | ३ | जुन्नर |
| | | | | ४ | आंबेगाव (घोडेगाव) |
| | | २ | सातारा | १ | जावली |
| | | | | २ | कोरेगाव |
| | | | | ३ | महाबळेश्वर |
| | | | | ४ | खंडाळा |
| | | ३ | सांगली | १ | मिरज |
| | | | | २ | कवठे मंहाकाळ |
| | | | | ३ | तासगाव |
| | | | | ४ | शिराळा |
| | | | | ५ | खानापूर (विटा) |
| | | | | ६ | आटपाडी |
| | | | | ७ | पलूस |
| | | | | ८ | कडेगाव |
| | | | | ९ | वाळवा (इस्लामपूर) |
| | | ४ | कोल्हापूर | १ | कागल |
| | | | | २ | हातकणंगले |
| | | | | ३ | गगनबावडा |
| | | | | ४ | भुदरगड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ५ | गडहिंग्लज |
| | | | | ६ | चंदगड |
| | | | | ७ | आजरा |
| ३ | नागपूर | १ | नागपूर | १ | नागपूर (ग्रामीण) |
| | | | | २ | कामठी |
| | | | | ३ | हिंगणा |
| | | | | ४ | सावनेर |
| | | | | ५ | कळमेश्वर |
| | | | | ६ | मौदा |
| | | | | ७ | पारशिवनी |
| | | | | ८ | कुही |
| | | | | ९ | भिवापूर |
| | | २ | भंडारा | १ | पवनी |
| | | | | २ | मोहाडी |
| | | | | ३ | लाखांदूर |
| | | ३ | चंद्रपूर | १ | सावली |
| | | | | २ | मूल |
| | | | | ३ | पोंभूरणा |
| | | | | ४ | गोंडपिपरी |
| | | | | ५ | वरोरा |
| | | | | ६ | सिंदेवाही |
| | | | | ७ | राजूरा |
| | | | | ८ | कोरपना |
| | | | | ९ | जिवती |
| | | ४ | गडचिरोली | १ | गडचिरोली |
| | | | | २ | धानोरा |
| | | | | ३ | चामोर्शी |
| | | | | ४ | मूलचेरा |
| | | | | ५ | देसाईगंज (वडसा) |
| | | | | ६ | आरमोरी |
| | | | | ७ | कुरखेडा |
| | | | | ८ | कोरची |
| | | | | ९ | अहेरी |
| | | | | १० | भामरागड |
| | | | | ११ | सिरोंचा |
| | | | | १२ | एटापल्ली |
| | | ५ | गोंदिया | १ | तिरोडा |
| | | | | २ | गोरेगाव |
| | | | | ३ | अर्जुनी मोरगाव |
| | | | | ४ | सालेकसा |
| | | | | ५ | सडक अर्जुनी |
| | | | | ६ | देवरी |
| | | ६ | वर्धा | १ | सेलू |
| | | | | २ | कारंजा |
| | | | | ३ | आष्टी |
| ४ | नाशिक | १ | नाशिक | १ | दिंडोरी |
| | | | | २ | पेठ |
| | | | | ३ | सुरगाना |
| | | | | ४ | बागलाण (सटाना) |
| | | | | ५ | चांदवड |
| | | | | ६ | निफाड |
| | | | | ७ | सिन्नर |
| | | २ | जळगाव | १ | एरंडोल |
| | | | | २ | धरणगाव |
| | | | | ३ | पारोळा |
| | | | | ४ | भडगाव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३ | नंदुरबार | १ | अकरानी (धडगाव) |
| ५ | अमरावती | १ | अमरावती | १ | भातकली |
| | | | | २ | धारणी |
| | | | | ३ | चिखलदरा |
| | | | | ४ | अंजनगाव |
| | | २ | अकोला | १ | तेल्हारा |
| | | ३ | बुलढाणा | १ | देऊळगाव |
| | | | | २ | संग्रामपूर |
| | | | | ३ | मोताळा |
| | | | | ४ | शेगाव |
| | | | | ५ | सिंदखेड राजा |
| | | | | ६ | लोणार |
| | | ४ | यवतमाळ | १ | आर्णी |
| | | | | २ | नेर |
| | | | | ३ | घाटंजी |
| | | | | ४ | मोरगाव |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | १ | छत्रपती संभाजीनगर | १ | फुलंब्री |
| | | २ | बीड | १ | केज |
| | | ३ | जालना | १ | जाफराबाद |
| | | | | २ | अंबड |
| | | | | ३ | मंठा |
| | | ४ | धाराशिव | १ | तुळजापूर |
| | | | | २ | लोहारा |
| | | | | ३ | उमरगा |
| | | ५ | नांदेड | १ | नांदेड |
| | | | | २ | भोकर |
| | | | | ३ | उमरी |
| | | | | ४ | देगलूर |
| | | | | ५ | नायगाव |
| | | ६ | परभणी | १ | पाथरी |
| | | ७ | लातूर | १ | रेणापूर |
| | | | | २ | जळकोट |
| | | | | ३ | शिरूर अनंतपाळ |
| | | | | ४ | औसा |
| | | | | ५ | निलंगा |
| | | | | ६ | देवणी |
| | | ८ | हिंगोली | १ | वसमत |
| **एकूण** | **६ विभाग** | **एकूण** | **३० जिल्हे** | **एकूण** | **१४४ तालुके** |

## प्रपत्र-१

## निवड झालेल्या गोशाळेमधील गोवंशीय पशुधनाची गणना तसेच भारत पशुधन प्रणालीवर (Ear tagging) नोंद असल्याबाबतचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे प्रमाणपत्र .

प्रमाणित करण्यात येते की, नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत दि. २७.०५.२०२५ रोजीच्या शासन निणर्यामधील निवड झालेल्या ............................................ ता. ...................... जि. .................... या गोशाळेस प्रत्यक्ष भेट देऊन गोशाळेमधील गोवंशीय पशुधनाची गणना केली असून सदरील गोशाळेकडे एकूण .............. एवढे गोवंशीय पशुधन असल्याचे आढळून आले.

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त गोशाळेकडे गणना करण्यात आलेल्या गोवंशीय पशुधनाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर केलेली असल्याची खात्री करण्यात आली आहे. नोंदणी केलेल्या सर्व गोवंशीय पशुधनाची एकूण संख्या ................. इतकी असून त्यांच्या इअर टॅग ची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे.

करिता उपरोक्तप्रमाणे गोवंशीय पशुधनाची संख्या व भारत पशुधन प्रणालीवर नोंद याबाबत प्रमाणित करण्यात येत आहे.

दिनांक- .....................

स्थळ- ........................

(नाव, स्वाक्षरी व शिक्का)

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,

जिल्हा- ............................

## प्रपत्र - १ नुसार गोवंशीय पशुधनाची संख्या व भारत पशुधन प्रणालीवर (NDLM) नोंद / Ear Tag याबाबतचे विवरणपत्र.

गोशाळेचे नाव- ........................................................................ ता......................... जि..................

| अ.क्र. | गोवंशीय पशुधन प्रकार (गाय/वासरु/ बैल) | नर/ मादी | वय (वर्ष व महिने) | भारत पशुधन प्रणालीवरील (NDLM) Ear Tag क्रमांक १२ Digit Number | भारत पशुधन प्रणालीवरील (NDLM) मालकाचे नाव | भारत पशुधन प्रणालीवरील (NDLM) मालकाचा आय डी (Owner ID,१५ Digit Number) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

दिनांक- ....................

स्थळ- ......................

**(नाव, स्वाक्षरी व शिक्का)**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,

जिल्हा- ...........................

## प्रपत्र- २

**निवड झालेल्या गोशाळेद्वारे प्रस्तावित मुलभूत सुविधांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित केलेले, खर्चाच्या अंदाजपत्रकाचे विवरण.**

**गोशाळेचे नाव** - ........................................................................ ता.- .................. जि.- .................

नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत दि. २७.०५.२०२५ च्या च्या शासन निर्णया प्रमाणे उपरोक्त गोशाळेस अनुदान वितरीत करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग यांचे पूर्व परवानगीस अधीन राहून खालील **नविन** मूलभूत सुविधा निर्माण करण्याकरिता आवश्यक खर्चाचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदरील अंदाजपत्रकामधील बाबी आणि खर्च तपासले असून ते बरोबर आहेत व त्यास जिल्हा बांधकाम विभागाकडून प्रमाणित केलेले आहे.

**(आकडे लक्षात)**

| अ. क्र. | प्रस्तावित केलेली मूलभूत सुविधा | प्रस्तावित कामाचे स्वरुप | प्रस्तावित कामाच्या खर्चाची अंदाजित रक्कम | प्रस्तावित कामे शा.नि. प्रमाणे आहेत किंवा कसे? (होय/नाही) | प्रस्तावित केलेल्या कामासाठी मागाणी रक्कम | प्रस्तावित काम पूर्ण करण्यासाठी मंजूर तरतूदी व्यतिरिक्त स्वखर्च रक्कम बाबत हमी (होय/नाही.) | अंदाजपत्रक तयार करणारी संस्था | अंदाजपत्रकास मान्यता देणारा अधिकारी (जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभाग) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | |

दिनांक- ....................

स्थळ- .......................

| **(नाव व प्रतिस्वाक्षरी)** | **(नाव व प्रतिस्वाक्षरी)** | **(अध्यक्ष/ सचिव नाव व स्वाक्षरी)** |
|---|---|---|
| जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभाग | संस्थेचे नाव- |
| जिल्हा- .......................... | जिल्हा- .......................... | ता.- ....................जि.- ...................... |

## प्रपत्र- ३

## करारनामा (बंधपत्रक)

**नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत अनुदान मंजूर झालेल्या संस्थेसोबत करावयाचा करारनामा** (रु .५००च्या -/ बाँड पेपरवर नोटराईज्ड करारनामा)

सदर करारनामा दि.रोजी खालील नमूद पक्षांमध्ये करण्यात येत आहे .................... .

१. संस्थेचे नाव व पत्ता:- ..................................................................................................

..................................................................................................

२. सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग, औंध, पुणे- ४११०६७.

मी,............................................... (नाव), संस्थेचे नाव ..............................................

पत्ता व संपर्क क्रमांक .................................................................................................

वरील नमूद संस्थेचा अध्यक्ष/ सचिव असून पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनाच्या नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत सदर संस्थेची राज्यस्तरीय निवड समितीने अनुदान प्राप्त होणेसाठी निवड केलेली असून खालील अटी व शर्ती मला बंधनकारक असल्याचे मी लिहून देत आहे.

१) आमच्या संस्थेच्या गोशाळा/पांजरपोळ या उपक्रमास शासनामार्फत आतापर्यत कोणतीही आर्थिक मदत अथवा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेली नाही.

२) प्राप्त अनुदानाचा विनियोग मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील नविन कामासाठी करण्यात येईल. जुन्या कामांच्या दुरुस्ती करिता सदरील योजनेतील अनुदान अनुज्ञेय नाही हे मला ज्ञात आहे.

३) मूलभूत सुविधांकरिता खर्चाच्या अंदाजपत्रकास आयुक्त पशुसंवर्धन यांची मंजूरी अनुदान वितरणासाठी बंधनकारक असल्याचे मला ज्ञात आहे.

४) राज्याच्या पशुपैदाशीच्या प्रचलीत धोरणानुसार देशी गायीच्या जातीचे संवर्धन व त्यांच्या संख्येत वाढ होण्याकरीता संस्थेकडील देशी तसेच गावठी गायींमध्ये शुध्द देशी गायीच्या जातीच्या वळूचे वीर्य वापरुन कृत्रिम रेतन करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

५) वरील प्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली नर वासरे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मागणीनुसार गोठीत रेतन प्रयोगशाळेसाठी नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

६) वरील प्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली उर्वरीत नर वासरे व कालवडी यांची मागणीप्रमाणे शेतकऱ्यांना विक्री करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

७) संस्थेमधील पशुधनामध्ये आंतरपैदास झाल्यास निर्माण होणाऱ्या नर वासरे / कालवडी यांची वाढ खुंटणे, कालवडी उशिरा माजावर येणे, वेळीच गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे इत्यादी विपरीत परीणाम होऊ नयेत यासाठी संस्थेमधील वळूचे खच्चीकरण करणे गरजेचे असेल.

८) संस्थेने प्राप्त अनुदानाच्या खर्चाचे स्वतंत्र हिशोब ठेवणे व सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्रासह सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे यांना सादर करण्यात येतील.

९) महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाद्वारे दुग्धव्यवसाय विभाग, स्वयंसेवी संस्था, सहकारी दूध संघ, पशुपैदासकाराच्या संघटना आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेशी समन्वय ठेवण्यात येईल.

१०) महाराष्ट्र गोसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकरण विहित करेल अशा सर्व अटी शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहिल.

११) संस्था महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ अंतर्गत वेळोवेळी पोलिस विभागामार्फत जप्त केलेल्या तसेच शेतकऱ्याकडील दुग्धोत्पादनास, शेती कामास, पशु- पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या/ असलेल्या गाय, वळू, बैल व वय झालेले गोवंश यांचा सांभाळ करेल. तसेच त्यांच्या करिता चारा- पाणी, निवारा व पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देईन.

१२) संस्था महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करणेबाबत अधिनियम, १९६० च्या तरतूदीचे पूर्ण पालन करेन.

१३) अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून मंजुर अनुदानातील ६० टक्के वितरित अनुदानाचा विनियोग अनुज्ञेय बाबीवरच ३ महिन्याच्या कालावधीत करणे बंधनकारक असेल. प्रथम टप्प्यातील अनुदानाचा विनियोग झाल्यानंतरच दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित देय अनुदान संस्थेस वितरित करण्यासाठी सदर योजनेमध्ये बांधकाम, विद्युतीकरण इ. बाबी तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे जिल्हा स्तरावरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करुन घेईन.

१४) नव्याने सामिल झालेल्या तसेच जन्मलेल्या गोवंशीय पशुधनाची नोंद (Ear tagging) भारत पशुधन प्रणालीवर घेणे संस्थेस बंधनकारक राहील.

१५) महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिकारी तसेच पशुसंवर्धन विभागातील अधिकारी यांना संस्थेची कागदपत्रे तसेच पशुधन व सोयी सुविधा यांची पाहणी करण्याकरिता उपलब्ध करुन देणेसाठी संस्था बांधिल राहील.

१६) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थेचे सर्व सदस्य, पदाधिकारी, विश्वस्त सामुहिक रित्या व वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील.

१७) शासन निर्णय पविआ- २०२१/प्र.क्र. ३५६/ पदुम- ३ मुंबई- ३२ दि. १७.०५.२०२३ व तद्अनुषंगाने निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय, सूचना, परिपत्रके याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास संस्था बांधिल राहील.

१८) अनुदानाचा विनियोग योग्य झाला नसल्यास जमिन महसूल संहिता- १९६६ अंतर्गत, जमीन महसूलाच्या थकबाकी संबंधाप्रमाणे (Arrears of Land Revenue) दसादशे १८% व्याजाने अनुदानाची वसूली करण्यात येईल हे संस्थेला मान्य आहे.

संस्थेने सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास वरील नमूद संस्थेचे अध्यक्ष/ सचिव/ विश्वस्त या नात्याने भारतीय दंड विधान संहिता व फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलमातील तरतूदीप्रमाणे अध्यक्ष/ सचिव/ विश्वस्त कारवाईस पात्र राहतील याची आम्हाला जाणीव आहे.

दिनांक- ....................

स्थळ- ......................

**(अक्ष्यक्ष/ सचिव नाव व स्वाक्षरी)**

संस्थेचा शिक्का-

| | | |
|---|---|---|
| **१. साक्षीदार** | **नाव** | **स्वाक्षरी** |
| **२. साक्षीदार** | **नाव** | **स्वाक्षरी** |

## प्रपत्र- ४

### गोवंशीय पशुधनाच्या संख्येनुसार तसेच प्राप्त अंदाजपत्रक व करारनामा यानुसार देय अनुदान या बाबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे शिफारस पत्र

नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत **दि. २७/०५/२०२५** रोजीच्या शासन निणर्यानुसार निवड झालेल्या ........................................................................................ ता. ..................... जि. .................... या गोशाळेस शासन निर्णयाप्रमाणे देय अनुदान वितरीत करण्यास्तव खालीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार अंदाजपत्रक व अनुदान याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

१. प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त गोशाळेकडे नोंदणी केलेल्या सर्व गोवंशीय पशुधनाची एकूण संख्या ................. इतकी असून, गणना करण्यात आलेल्या गोवंशीय पशुधनाची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर केलेली असल्याची खात्री करण्यात आली आहे व त्यांच्या इअर टॅग ची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे. **प्रपत्र- १ संलग्न.**

२. उपरोक्त गोशाळेद्वारे प्रस्तावित मुलभूत सुविधांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित केलेले, खर्चाच्या अंदाजपत्रकाचे विवरण सोबत जोडलेल्या प्रपत्र- २ मध्ये प्रतिस्वाक्षरी करुन सादर करण्यात येत आहे. **प्रपत्र- २ संलग्न.**

३. उपरोक्त गोशाळेद्वारे नविन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या सुधारित योजनेंतर्गत अनुदान मंजूर झालेल्या संस्थेसोबत करावयाचा करारनामा रु. ५००/- च्या बॉंड पेपरवर नोटराईज्ड करारनामा सादर करण्यात येत आहे. **प्रपत्र- ३ संलग्न.**

४. उपरोक्त अ.क्र. १ ते ३ नुसार ........................................................................................ ता. ..................... जि. .................... ह्या गोशाळेस शासन निर्णयाप्रमाणे मंजूर अनुदान रुपये .......... लक्ष पैकी सर्व अटींचा विचार करता रुपये .......... लक्ष इतक्या खर्चाचे अंदाजपत्रकास पूर्व परवानगी व प्रशासकीय मंजूरी तसेच प्रथम टप्प्यातील ६० टक्के अनुदान रुपये .......... लक्ष मंजूर करुन वितरीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक- .....................

स्थळ- ........................

**(नाव व स्वाक्षरी)**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,

जिल्हा- ............................